**ठळक बातम्या**

- बारामती विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीतून काँग्रेसची माघार, दिवंगत अजित पवार यांना आदरांजली म्हणून माघार घेत असल्याचं काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचं स्पष्टीकरण

- पुदुचेरी विधानसभेसाठी १ वाजेपर्यंत ५७ टक्के, आसाममधे ६० टक्के तर केरळात ५० टक्के मतदानाची नोंद

- १५ हजार ४०० टन एलपीजी घेऊन भारताचं ग्रीन आशा जहाज मुंबईजवळच्या जेएनपीए बंदरात दाखल

- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षा २०२४ चे निकाल जाहीर

**आणि**

- राज्यात मका खरेदीला येत्या ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**<><><><><>**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसनं माघार घेतली आहे. अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत दिली. भाजपाच्या विचारधारेला विरोध म्हणून काँग्रेसनं बारामती मतदारंघात उमेदवार दिला होता. मात्र राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या विविध नेत्यांनी काँग्रेसच्या नेत्यांशी संपर्क साधून निवडणूक बिनविरोध करण्याची विनंती केली, त्यामुळे सामंजस्य आणि संवादाची भूमिका घेत पक्षानं हा निर्णय घेतल्याचं सपकाळ यांनी सांगितलं. निवडणूक बिनविरोध होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोन केला होता, मात्र या निर्णयाशी त्याचा काहीही संबंध नाही. अजित पवार यांनी भाजपाशी युती करण्याला आपला विरोध कायम राहील. त्यांच्यासारख्या मोठ्या नेत्याच्या अपघाती मृत्यूनंतर साधा गुन्हाही

महाराष्ट्रात दाखल होत नाही, हे दुर्दैवी असल्याचं ते म्हणाले. मात्र, दोन्ही राष्ट्रवादींच्या नेत्यांनी केलेल्या भावनिक आवाहनाला प्रतिसाद देत राज्यातल्या सर्व ज्येष्ठ नेत्यांशी चर्चा करून निवडणुकीतून मागे हटत असल्याचं सपकाळ म्हणाले. खरी लढाई ही २०२९मध्ये होईल आणि त्यावेळी बारामतीतून काँग्रेसचा आमदार निवडून येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतून काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेण्याचे आदेश काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी दिले आहेत. दिवंगत अजित पवार यांच्याप्रती आदर दर्शवण्यासाठी काँग्रेसने आपला उमेदवार मागे घेतल्याचं चेन्निथला यांनी वार्ताहरांना सांगितलं. या निर्णयानुसार कांग्रेसचे उमेदवार आकाश मोरे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला.

**<><><><><>**

राज्यसभेचे नवनिर्वाचित सदस्य राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्थ अजित पवार यांना आज उपराष्ट्रपती तसंच राज्यसभेचे अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. महाराष्ट्रातून राज्यसभेसाठी निवडून आलेल्या पार्थ पवार यांचा शपथविधी संसद भवनातल्या अध्यक्षांच्या परिषद कक्षात झाला.

**<><><><><>**

राष्ट्रकुल संसदीय संघटना – भारत विभाग - ७ च्या संमेलनाचं उद्घाटन आज गोव्यात लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या हस्ते झालं. आंतर संसदीय सहकार्य वृद्धिंगत करणं तसंच विकासाच्या प्रमुख मुद्दयांवर चर्चा करण्यासाठी या २ दिवसीय संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. संमेलनाच्या पहिल्या दिवशी आज, २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचं ध्येय साध्य करण्यात युवा संसद सदस्यांचं योगदान या विषयवार चर्चासत्र होणार आहे. तर उद्या

व्यापार, पर्यटन, शहरीकरण, पर्यावरण यासारख्या प्रादेशिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे.

**<><><><><>**

जागतिक बँकेनं भारताच्या आर्थिक वाढीच्या दराचा अंदाज बदलून वाढवला आहे. या आधी २०२६ - २७ या वर्षात भारताची जीडीपी वाढ ६ पूर्णांक ३ दशांश टक्के दरानं होईल असा अंदाज होता. तो आता ६ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल असं जागतिक बँकेच्या ताज्या अहवालात म्हटलं आहे. या वर्षात भारत दक्षिण आशियातल्या आर्थिक प्रगतीचं इंजिन असेल असं अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

पुदुचेरी, आसाम आणि केरळ विधानसभा निवडणुकांसाठी आज मतदान होत आहे. तिन्ही ठिकाणी मतदारांचा उत्साह दिसत आहे. केरळात सर्व १४० मतदारसंघात उत्साहाने मतदान होत असून ११ वाजेपर्यंत ३३ टक्के मतदान झालं. आसाममधे १२६ जागांवर ३९ टक्के तर पुदुचेरीतल्या ३० जागांवर ३७ टक्के मतदारांनी मतदान केलं.

केरळमधे मुख्यमंत्री पिनराई विजयन, काँग्रेस खासदार शशी थरूर, अभिनेता मोहनलाल या मान्यवरांनी मतदानाचा हक्क बजावला. आसाममधे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा, काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांच्या सह अनेक मान्यवरांनी मतदान केलं. राज्यात अनेक ठिकाणी भर पावसातही मतदारांनी मतदान केंद्रांवर गर्दी केली आहे.

**<><><><><>**

कर्नाटकातल्या बागलकोट आणि दावणगिरी विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी देखील आज मतदान होत आहे. दुपारी १ वाजेपर्यंत

बागलकोटमधे ४३पूर्णांक७५ शतांश तर दावणगिरीत ३७ पूर्णांक १७ शतांश टक्के मतदान झालं.

नागालँडमधे २८ कोरिडांग मतदारसंघात ५९ पूर्णांक ५२ शतांश टक्के तर त्रिपुरामधे धर्मनगर मतदारसंघात ५२ पूर्णांक ७६ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

<><><><><>

भारताचं 'ग्रीन आशा' नावाचं एलपीजी वाहून आणणारं जहाज होर्मुझची सामुद्रधुनी यशस्वीरीत्या पार करून आज मुंबईजवळ जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाच्या बंदरात दाखल झालं आहे. त्यात १५ हजार ४०० टन एलपीजी साठा आहे. इराण, विरुद्ध अमेरिका आणि इज्राएलचं युद्ध सुरु झाल्यापासून जे एन पी ए बंदरात आलेलं हे पहिलंच एलपीजीवाहू जहाज आहे. जहाज आणि त्यावरचे सर्व कर्मचारी सुरक्षित आहेत. अस्थिर युद्धपरिस्थितीत देशाच्या एलपीजी पुरवठ्याचं सातत्य राखण्यात भारताच्या सागरी वाहतुकीची कार्यक्षमता यातून दिसून येते.

<><><><><>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२४ चा निकाल काल जाहीर झाला. सोलापूर जिल्ह्यातला विजय लामकाने सर्वसाधारण तसेच मागासवर्ग गटातून राज्यात पहिल्या स्थानी असून सोलापूरमधल्याच आरती जाधव या महिलांमधून राज्यात प्रथम आल्या आहेत. २७ ते २९ मे २०२५ दरम्यान ही परीक्षा झाली होती. विविध २० संवर्गांतल्या एकूण ४६१ पदांसाठी याद्वारे उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. उमेदवारांचा सविस्तर निकाल MPSC च्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. वैद्यकीय तपासणी पूर्ण न केलेल्या उमेदवारांचा अंतिम निकालात समावेश करण्यात आलेला नाही, असंही आयोगानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

खरीप पणन हंगाम २०२५-२६ अंतर्गत किमान आधारभूत खरेदी योजनेत पूर्व नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडून मका खरेदीसाठी केंद्रसरकारने ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. राज्यानी खरेदी केलेला साठा पुढच्या खरेदी हंगामापूर्वी वितरीत करावा तसंच हा मका वापरायोग्य असल्याचे गुणवत्ता प्रमाणन आवश्यक आहे अशा सूचना केंद्रानं दिल्या आहेत. राज्य शासनाच्या सर्व यंत्रणांनी केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून खरेदी प्रक्रिया राबवावी,अशी सूचना राज्याच्या अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागाने दिली आहे.

<><><><><>

अकोला जिल्ह्यातल्या १०८ आपले सरकार केंद्रांवर कारवाई करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरुन 'आपले सरकार सेवा केंद्र' आणि 'आधार सेवा केंद्रां'ची सखोल पडताळणी मोहीम राबवण्यात आली. यामध्ये केंद्र त्यांच्या नियोजित ठिकाणी कार्यरत नसणं, सेवा गुणवत्तेमध्ये त्रुटी, नागरिकांना वेळेत सेवा न मिळणं अशा गंभीर बाबी आढळल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

<><><><><>

आपत्ती व्यवस्थापन सज्जता वाढवण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात आज सराव घेण्यात आला. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नवी दिल्ली, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, मुंबई, यांच्यासह अग्निशमन विभाग, पालिकेचा आरोग्य विभागानेही या सरावात सहभाग घेतला. चक्रिवादळापासून ते रासायनिक गळतीपर्यंतच्या विविध आपत्तींवेळी परिस्थिती हाताळण्यासाठीची प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली.

//<><><><><>//